# प्रकरण **15** वे

## रुग्णालयातील कार्य चालविण्यासाठी ठरविण्यात आलेले सर्वसाधारण नियम

- बाह्यरुग्ण विभागात दाखल झालेल्या प्रत्येक रुग्णाला त्या विभागातील वैद्यकिय अधिकाऱयाने लवकरात लवकर तपासले पाहिजे.
- अस्वस्थ व अतिगंभीर रुग्णाला वैद्यकिय अधिकाऱयाने तपासून त्वरीत औषधोपचार करावे.
- सकाळी 10 च्या आत आंतर रुग्णांना तपासणे आणि गरजेनुसार परत तपासणी करणे.
- प्रयोग शाळेत चाचण्या या बाह्यरुग्ण विभागाचा तपासणीपेपर दिल्या दिवशीच किंवा जास्तीत जास्त दुसऱया दिवशी सकाळी झाल्या पाहिजेत.
- क्षकिरण व हृदयस्पंदन आलेख हे अति गंभीर रुग्णांच्या बाबतीत त्याच दिवशी घ्यावेत व इतर रुग्णांना दुसऱया दिवशी घेतले तरी चालतील.
- अनुसुचित औषधे प्रत्येक दिवशी रुग्णांना पुरविणे.
- अनुअनुसुचित औषधे रुग्णांना लवकरात लवकर पुरविणे.
- तक्रारीचे निवारण त्वरीत करणे.
- सेवाशुश्रुषा कर्मचाऱयांने लवकरात लवकर जास्तीत जास्त सेवाशुश्रुषा देणे.
- रुग्णाप्रति कर्मचाऱयाने प्रेमाने व आदराने वागावे.
- गरीब धर्मादाय निधी हा गरजू व गरीब रुग्णांसाठी वापरावा.